जा.क्र.मुदवसुअ/प्रा/परिपत्रक/ 1528 /२०२४
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/ प्राधिकरण, मुंबई
दि. 12/07/24

## दक्षता विभागाचे परिपत्रक - १३

विषय- उपकरप्राप्त इमारतीमधील भाडेकरु/ रहिवाशी यांची पात्रता तपासताना घ्यावयाच्या दक्षतेबाबत.

उपकरप्राप्त इमारत पूनर्बांधणीकरिता अधिग्रहित करताना, उपकरप्राप्त इमारतीच्या पूनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र जारी करताना अथवा इमारतीच्या दुरुस्तीचेवेळी भाडेकरु/ रहिवाशी यांना तात्पुरत्या स्वरुपात संक्रमण शिबीरात स्थलांतरीत करताना भाडेकरु / रहिवाशी यांची पात्रता निश्चित केली जाते.

उपकरप्राप्त इमारतीच्या पूनर्विकासासाठी ना हरकत प्रमाणपत्र जारी करताना भाडेकरु / रहिवाशी यांची पात्रता निश्चीत करणेसाठी गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्रशासन यांचे दि.१६/८/२०१० रोजीच्या शासन निर्णयात मार्गदर्शक तत्त्वे नमूद करण्यात आली आहेत.

तसेच उपाध्यक्ष प्राधिकरण यांचे दि. ०२/०७/२०१४ रोजीच्या परिपत्रकात बृहत सुचिवरील गाळे वितरणासाठी उपकरप्राप्त इमारतीच्या भाडेकरु/ रहिवाशांची पात्रता निश्चित करताना शासनाचे दि. १६/०८/२०१० रोजीच्या शासननिर्णयातील निकष / मार्गदर्शक तत्त्वानुसार भाडेकरु/ रहिवाशी यांची पात्रता तपासावी असे नमुद करण्यात आले आहे.

पात्रता निश्चित करताना तपासणी करावयाच्या कागदपत्रांच्या यादीत मतदार यादी, विद्युत देयक यांचा समावेश आहे. तसेच ज्या ठिकाणी उपकरप्राप्त इमारतीची मिळकत म्हाडातर्फे अधिग्रहित केली गेली आहे अशा प्रकरणी शासनाने जारी केलेल्या राजपत्राचा आधार घेतला जातो.

उपकरप्राप्त इमारतीमधील भाडेकरु / रहिवाशी यांची पात्रता खोट्या कागदपत्रांच्या आधारे निश्चित करण्यात येवून त्यांना बृहत सुचिवरील गाळा वितरीत केल्याच्या तक्रारी या कार्यालयास प्राप्त होत असतात.

एका प्रकरणामध्ये चौकशी दरम्यान असे आढळून आले की, मुळ राजपत्रामध्ये ६३ भाडेकरुंची नावे होती. परंतु काही गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांनी त्याच इमारतींबाबत एक बनावट राजपत्र तयार केले ज्यामध्ये या ६३ भाडेकरुंव्यतिरिक्त अंतस्थ हेतुने अतिरिक्त १५ नावे समाविष्ट केली व बृहतसुचि समितीला सादर केली. बृहतसुचि समितीने बनावट राजपत्राच्या आधारे या १५ लोकांना पात्र केले व त्यांना गाळ्याचे वितरण केले.

तसेच दुस-या प्रकरणामध्ये कार्यकारी अभियंता यांचे कडून तयार करण्यात आलेली भाडेकरुंची यादी ही बनावट असल्याचे आढळले आहे. या बनावट यादीच्या आधारे बृहतसुचि समितीने जे मुळ भाडेकरु नाहीत त्यांना पात्र केले व त्यांना गाळा वितरीत केला.

या परिपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, भाडेकरु / रहिवाशांची पात्रता निश्चित करताना भाडेकरुमार्फत सादर करण्यात आलेले विद्युत देयक, मतदार यादीचा उतारा यांचे आधारावर निर्णय न घेता बृहतसुची समितीने सदर कागदपत्रांचे सत्यतेबाबत संबंधित यंत्रणांकडून, उदा. विद्युत देयकाची पडताळणी विज कंपनी कडून, मतदार यादीच्या उता-याची पडताळणी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून, करुन घ्यावी व नंतरच पात्रतेबाबतचा निर्णय घ्यावा.

संबंधित कार्यकारी अभियंता यांनी बृहतसुचि समितीला भाडेकरुंच्या पात्रते अपात्रते बाबतचा अहवाल सादर करताना कागद बनावट नाहित याची खातरजमा करावी.

ज्या प्रकरणांमध्ये मिळकत अधिग्रहित झालेली आहे अशा प्रकरणांमध्ये उपलब्ध असलेले राजपत्र याच्या सत्यतेची पडताळणी बृहतसुचि समितीने जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडून करुन घ्यावी व नंतरच या बाबतचा निर्णय घेण्यात यावा.

सदर परिपत्रकाचे काटेकोर पालन करण्यात यावे.

(विनीत अग्रवाल)
अपर पोलीस महासंचालक तथा
मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.

प्रति,

मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

मुख्य अधिकारी, कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ मंडळ.

मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.

मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

मुख्य अधिकारी, नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

मुख्य अधिकारी, अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

मुख्य अधिकारी, छत्रपती संभाजीनगर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

मुख्य अधिकारी, नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ.

प्रत उपाध्यक्ष/ प्राधिकरण यांना माहितीसाठी.